MHAH180025082025

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | २७/०३/२०२५ | | | |
| नोंदणी दिनांक | २७/०३/२०२५ | | | |
| निकाल दिनांक | ०१/०४/२०२६ | | | |
| कालावधी | वर्ष | महिने | दिवस | |
| | ०१ | ०० | ०५ | |

# दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, राहुरी, ता. राहुरी जि. अहमदनगर यांच्या न्यायालयात

( पिठासन अधिकारी: मयुर ए. पवार )

**विवाह अर्ज क्र. १०२/२०२५** **निशाणी क्र. १५**

[redacted]
वय : २५ वर्षे, धंदा : गृहिणी,
द्वारा : [redacted]
रा. कोल्हार खुर्द, ता. राहुरी,
जि.अहमदनगर. ...**अर्जदार**

...**विरुध्द**...

[redacted]
वयः ३० वर्षे, धंदा : व्यवसाय
रा. कोल्हार खुर्द, ता. राहुरी,
जि.अहमदनगर. ...**सामनेवाले**

---

**प्रकरण:** हिंदू विवाह अधिनियम १९५५ चे कलम १३(१)(i-a)अन्वये.

---

| | |
|---|---|
| अर्जदारा तर्फे विधिज्ञ | :- श्री. व्ही. ए. होले |
| सामनेवाली तर्फे विधिज्ञ | :- एकतर्फा |

**–: न्यायनिर्णय :–**

(उदघोषित दिनांक ०१/०४/२०२६)

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज सामनेवालेविरूध्द हिंदू विवाह अधिनियम १९५५ चे कलम १३(१)(i–a)अन्वये विवाह विच्छेदनासाठी दाखल केला आहे.

**अर्जदारांचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे:–**

२. अर्जदार व सामनेवाले हे पती–पत्नी असुन त्यांचा विवाह दि. १७/०९/२०१९ रोजी सदगुरू भुवन मंगल कार्यालय, आळंदी, ता. खेड, जि. पुणे येथे झाला. त्यानंतर दि. २०/०९/२०१९ रोजी अर्जदार व सामनेवाले यांचे नातेवाईकांनी त्यांचा हिंदु धर्म शास्त्र रितीरिवाजप्रमाणे मौजे कोल्हार खुर्द, ता. राहुरी, जि. अहमदनगर येथे मोठ्या थाटामाटात करून दिला. त्यावेळी अर्जदाराचे आई वडिलांनी सर्व संसार उपयोगी वस्तु तसेच अर्जदारास स्त्रीधन म्हणून सुमारे ३ ते ४ तोळयाचे अलंकार घालून पार पडला. अर्जदार व सामनेवाले हे एकाच गावातील राहणार आहेत. सन २०१९ मध्ये अर्जदार इ.१२ मध्ये शिक्षण घेत होती व सामनेवाला हा ड्रायव्हर व्यवसाय करत होता. त्यादरम्यान अर्जदार व सामनेवाला यांचेत प्रेमसंबंध निर्माण झाले, त्यातुनच त्यांनी दि. १७/०९/२०१९ रोजी आळंदी येथे प्रेमविवाह केला. त्यादरम्यान अर्जदाराचे आई–वडिलांनी सामनेवालेविरूध्द राहुरी पोलीस स्टेशनला भा.द.वि.कलम ३६३ गु.र.नं. ६०/२०१९ दाखल केला होता. त्यानंतर सामनेवाला यांनी अर्जदाराचे कुटुंबियांवर दबाव टाकून त्याचा व अर्जदार यांचा दि. २०/०९/२०१९ रोजी विवाह करण्यास भाग पाडले. त्यानंतर

अर्जदार ही सामनेवाला याची कायदेशिर पत्नी म्हणून नांदु लागली. परंतु अर्जदार हिचा लवकरच भ्रमनिराश झाला. सामनेवाला यास प्रथमपासूनच दारूचे व्यसन असल्याचे अर्जदारास समजले. सामनेवाला हा किरकोळ कारणावरून अर्जदारास शिवीगाळ करून मारहाण करत असे. दरम्यान सामनेवालापासून अर्जदारास मुलगी नामे सान्वी झाली. मुलगी झाल्यानंतरही सामनेवाला व त्याच्या कुटुंबियांत कुणताही बदल झाला नाही.

३. अर्जदाराने पुढे असे कथन केले की, सामनेवाला याची मोठी बहीण, आई–वडिल, भाऊ व सामनेवाला याची बहिण यांना प्रथमपासूनच अर्जदार पसंत नव्हती. सामनेवाला याची बहिण अर्जदारास म्हणत असे की, 'या मरतुकड्या पोरीत तु काय पाहीलस, ही वा–याने उडून जाईल, तु हिला सोडून दे मी चांगल्या खानदानाची मुलगी पाहून तुझे शोकात दुसरे लग्न करून देईल'. अर्जदारास मुलगी झाल्यानंतर सामनेवाला व त्याचे कुटुंबिय नाराज झाले व त्यांना मुलगा हवा होता असे म्हणून अर्जदारास अपमानित करत असे. सामनेवाले याचे आई–वडिल हे अर्जदारास उपशीपोटी ठेवून तिच्याकडून कष्टाची कामे करून घेत असत. तसेच सामनेवाला हा दारू पिऊन येवून अर्जदारास शिवीगाळ करून मारहाण करत असे. अर्जदाराच्या आई–वडिलांना मानसिक त्रास होवू नये म्हणून अर्जदार सर्व त्रास सहन करून नांदत होती.

४. सामनेवाला यास स्वत:ची चारचाकी गाडी घेण्यासाठी अर्जदार हिस तिचे आई–वडिलांकडून पैसे आणण्याची मागणी करत असे व पैसे न आणल्यास माहेरी निघून जा असे म्हणून मानसिक व शारीरिक त्रास देत असे. सामनेवाला हा अर्जदारास सतत म्हणून असे की तु येथून निघून जा मला दुसरे लग्न करायचे आहे

असू म्हणून धमकी देत असे. सामनेवाला व त्याचे कुटुंबिय अर्जदारास किरकोळ कारणांवरून शिवीगाळ व मारहाण करून रात्री अपरात्री घराबाहेर हाकलून देत असे. त्यानंतर सुमारे १३ ते १४ महिन्यापुर्वी सामनेवाला व त्याचे कुटुंबिय यांनी अर्जदाराकडे पैशाची मागणी करून वाद निर्माण केला व तिला मारहाण करून तिचे सर्व स्त्रीधन हिसकावून घेवून मुलगी सान्वी हिचेसह घराबाहेर हाकलून दिले व पैसे न आणल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. तेंव्हापासून अर्जदार माहेरी राहत असून सामनेवाला अगर त्याचे कुटुंबिय अर्जदारास भेटण्यास अगर तिला नांदावयास नेण्यास आले नाही. अर्जदाराने स्वत: व इतरांमार्फत नांदण्यास जाण्याचा प्रयत्न केला परंतु सामनेवाला व त्याचे कुटुंबियांनी तिला घरात घेण्यास नकार दिला.

५. अर्जदाराने पुढे असे कथन केले की, दि. २७/०९/२०२४ रोजी सकाळी १०.३० वा. सामनेवाला याने दारू पिऊन अर्जदाराचे माहेरी येवून तिला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून तिला मारहाण केली. त्यावेळी अर्जदाराचे आई वडिलांनी सामनेवाला यास समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असतना सामनेवाला यांनी अर्जदाराचे आई वडिलांना धक्काबुक्की केली व जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर अर्जदाराने सामनेवाले विरूध्द भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) अन्वये गुन्हा र.नं. १६९८/२०२४ राहुरी पोलीस स्टेशनला दाखल केला. अशाप्रकारे सामनेवाला याने अर्जदाराचा शारीरिक व मानसिक छळ करून नांदण्यास नकार दिला. अशा प्रकारे सामनेवाली हिने अर्जदारास पत्नी सुखापासुन वंचीत ठेवून मानसिक क्रुरता केली. करीता, अर्जदाराने प्रस्तुतचा विवाह विच्छेदनाचा अर्ज दाखल केला आहे.

६. सामनेवाला यास नि.क्र. ९ अन्वये प्रस्तुत प्रकरणाची नोटीस प्राप्त होऊनही ते प्रस्तुत प्रकरणात हजर झालेले नसल्याकारणाने त्यांच्यावरिुध्द प्रस्तुतचे प्रकरण हे एकतर्फा चालविण्यात आले.

७. प्रस्तुत अर्जाचे निकालाकरीता माझे विचाराधीन खालील मुद्दे उपस्थितीत होतात, त्या मुद्यांवरील निष्कर्ष कारण मिमांसेसहीत मी खालील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे सिध्द करते काय की, सामनेवाला याने तिला मानसिक क्रुरतेने वागविले ? | होय. |
| २. | अर्जदार हे सिध्द करते काय की, केवळ विवाहविच्छेदन हा एकमेव पर्याय आहे? | होय. |
| ३. | अर्जदार मागितेलेल्या अनुतोषास पात्र ठरते का? | होय. |
| ४. | काय आदेश आणि हुकूमनामा? | – अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ करीता:**

८. मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे पुराव्यावरील विश्लेषणाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी त्यावर एकत्रितपणे चर्चा करीत आहे.

९. प्रस्तुत प्रकरणातील निर्विवाद तथ्ये असे की, अर्जदार व सामनेवाला हे पती पत्नी असुन त्यांचे विवाहसंबंध आजरोजी कायम आहेत.

१०. अर्जदार यांनी स्वत:ला निशाणी क्र. १० अन्वये तपासलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराचा गैरअर्जदारामार्फत कुठलाही उलटतपास घेण्यात आलेला नाही. करीता अर्जदार यांचा पुरावा विना आव्हानीत व अखंडीत राहतो.

११. प्रस्तुत प्रकरणात सामनेवाली यांना नोटीसची बजावणी झाल्यानंतर ते प्रस्तुत प्रकरणात हजर झाले नाहीत. तसेच अर्जदारचा उलटतपासही घेतला नाही. अशा परिस्थितीत सामनेवाली यांच्याविरुध्द कलम ११४ भारतीय पुरवा कायदा अन्वये प्रतिकुल तर्क काढता येतो.

१२. अर्जदारांचे विधिज्ञ यांनी प्रस्तुत प्रकरणात असा युक्तीवाद केला की, सामनेवाले यांनी अर्जदास पत्नी सुखापासुन वंचीत ठेवले. तसेच कुठलेही संयुक्तीक कारण नसताना अर्जदाराचा परित्याग करुन मानसिक क्रुरता केली. करीता, अर्जदार हा मागितलेल्या अनुतोषास अर्जदार पात्र असल्याचा युक्तीवाद केला.

१३. कलम १३(१)( i-a) हिंदु विवाह कायद्याअन्वये ' लग्नानंतर एखाद्या जोडीदाराने दुस-यावर मानसिक किंवा शारिरिक क्रुरता केलेली असेत तर सदरची बाब ही घटस्फोटाचे एक कारण ठरते'.

१४. प्रस्तुत प्रकरणात अर्जदार यांचा कुठलाही उलटतपास हा सामनेवाला यांनी घेतलेला नसल्याकारणाने अर्जदार यांचा पुरावा विना आव्हानीत व अखंडीत राहतो. अर्जदार यास सामनेवाला यांनी कुठलेही वैवाहिक सुख दिलेले नसल्याकारणे

सामनेवाला यांची ही कृती मानसिक क्रुरता या व्याखेत मोडते. करीता, सामनेवाली यांनी अर्जदार यास मानसिक क्रुरतेने वागविले या अभिप्रायाप्रत मी आलेलो आहे.

१५. अर्जदाराचे कथनांनुसार, लग्नानंतर काही दिवसच सामनेवाला तिच्यासोबत नांदला व त्यानंतर ती तिच्या मुलीसह माहेरीच रहात आहे. दरम्यानच्या कालावधीत सामनेवाला याने अर्जदारास नांदण्यास घेवून जाण्याचा कुठलाही प्रयत्न केला नाही. अशा परिस्थीत विवाह विच्छेदन हा केवळ एकमेव पर्याय असल्याचे दिसले. करीता, मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर मी होकारार्थी असे देतो.

**मुद्दा क्र. ४ करीता–**

१६. मुद्दा क्र. १ ते ३ यांच्या होकारार्थी निष्कर्षाअन्वये मी मुद्दा क्र. ४ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२) अर्जदार व सामनेवाला यांचे विवाह विच्छेदन हे आजच्या तारखेपासुन झाल्याचे घोषित करण्यात येते.

३) येणेप्रमाणे हुकुनामा करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषित केला.)

MAYUR EKNATHRAO PAWAR

Digitally signed by MAYUR EKNATHRAO PAWAR
Date: 2026.04.01 17:12:21 +0530

**( मयुर ए. पवार)**

दिनांकः–०१/०४/२०२६.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
ता. राहुरी, जि. अहमदनगर.